जेव्हा तुम्ही काहीच करत नाही तेव्हा फक्त एकच करा,ते म्हणजे प्रयत्न

दैनिक

लोकक्रांतीचा आरंभ

# लोकआरंभ

dainiklokaarambh@gmail.com

LOK AARAMBH

संपादक:राहुल मारोतीराव वाईकर

कार्यकारी संपादक गोकुळ इंगोले

बीड/महाराष्ट्र वर्ष ३ रे | शुक्रवार ३० मे २०२५ | अंक १६७ ● पाने ४ | RNI/MAHMAR/2022/84215 | किंमत २ रु




# देवेंद्र फडणवीसांकडून शरद पवारांच भरभरुन कौतुक



एक्सप्रेस अड्डा या कार्यक्रमात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शरद पवार यांच्या कार्यपद्धतीच कौतुक केलं. त्यावर आज संजय राऊत बोलले. "मुख्यमंत्र्यांनी या राज्याचे, देशाचे ज्येष्ठ नेते शरद पवार यांच्यातल्या अथक परिश्रम आणि सातत्य याचं कौतुक केलय. त्याच्याबद्दल कोणाला आश्चर्य वाटण्याच कारण नाही. तुम्ही राजकीय टीका कितीही केली, तरी हे एकानेत्यामध्ये जे गुण आहेत, ते तुम्हाला, महाराष्ट्राला, देशाला मान्य करावेच लागतील. नुसतं कौतुक करुन चालणार नाही. परिश्रम, सातत्य आणि संयम या गुणाची कास देवेंद्र फडणवीस आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी सुद्धा घ्यावी" असं संजय राऊत म्हणाले."पराभवात किंवा निवडणुकीच यश-अपयश अनेक नेत्यांना थांबवत नाही. बाळासाहेब ठाकरे होते, आता शरद पवार सगळ्यांचे आदर्श आहेत. इतक्यावर्षांनी देवेंद्र फडणवीस यांना पवारांचे हे गुण दिसले यासाठी त्यांचे आभार मानले पाहिजेत" असं संजय राऊत म्हणाले. "ज्याअर्थी देवद्र फडणवीसांनी शरद पवारांच इतकं कौतुक केलं, त्याअर्थी त्यांनी दिल्लीची परवानगी घेतली असेल. आम्हाला पवारांविषयी आदर व्यक्त करण्याला कोणाची परवानगी लागत नाही. भाजपचे सर्व निर्णय धोरणात्मक असतात. देवेंद्र फडणवीसांनी परवा छगन भुजबळांच कौतुक केलं. त्यांच्या कौतुकाला फार महत्त्व देऊ नका. उद्या ते नवाब मलिकांच कौतुक करतील. भाजपचा भरवसा नाही. ते कधी कोणावर हल्ला करतील, कोणाचं कौतुक करतील हे त्यांनाच माहित" असं संजय राऊत यांनी सांगितलं. 'तहान लागल्यानंतर कोणी गटारातल गढूळ पाणी पित नाही' शरद पवारांची नवीन पिढी भाजपासोबत जाण्यासाठी व्याकुळ आहे, असा प्रश्न विचारला. त्यावर संजय राऊत म्हणाले की,

## शरद पवार भाजपसोबत जातील का?

शरद पवार गटात दोन मतप्रवाह आहेत, एक मोठा गट भाजपासोबत जाण्यासाठी व्याकुळ आहे. पण शरद पवारांनी अजून स्टँड घेतलेला नाही, या प्रश्नावर संजय राऊत म्हणाले की, "हा त्यांच्या पक्षाचा अंतर्गत विषय आहे. मला ज्ञान आहे, त्यानुसार शरद पवार भाजपासोबत जाणार नाहीत. पवारसाहेबांनी राजकारणात खूप मोठी इनिंग खेळलेली आहे, खेळतायत. आता ते कोचिंगच्या भूमिकेत आहेत. त्यामुळे मी त्यांना ओळखतो. त्यांची विचारधारा भूमिका मला माहित आहे. अशा नेत्यांना वयाची बंधन नसतता. शरद पवारांची विचारधार भूमिका पाहिल्यावर ते भाजपसोबत कधी जाणार नाहीत हा माझा विश्वास आहे"

## बीड शहरातील मुख्य रस्त्यावर लोकसहभागातून वृक्षलागवड
## डॉ.योगेश क्षीरसागर यांची माहिती; बीडमध्ये सामाजिक संघटनांसोबत नियोजनार्थ बैठक

बीड (प्रतिनिधी)दि.२९ : राज्याचे उपमुख्यमंत्री व बीड जिल्ह्याचे पालकमंत्री अजितदादा पवार हे शहरात आल्यानंतर अधिकाधिक वृक्ष लागवड व्हावी, यासंदर्भात आग्रही असतात. त्याअनुषंगाने जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्याशी प्राथमिक चर्चा झाली. पर्यावरण दिनाच्या पार्श्वभूमीवर बीड शहरातील मुख्य रस्त्यावर लोकसहभागातून वृक्ष लागवड करण्यात येणार आहे, अशी माहिती राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे युवा नेते डॉ.योगेश क्षीरसागर यांनी दिली आहे. बीडमध्ये वृक्षलागवडीच्या नियोजनर्थ गुरुवारी (दि.२९) रोटरी क्लब ऑफ मीडटाऊन, आयएमए, पतंजली, क्रेडाई या संघटनांसोबत बैठक झाली.



शहरातील मुख्य मार्गावर पहिल्या टप्प्यात एक मार्ग निवडून वृक्ष लागवड केली जाणार आहे. रस्त्यावरील दुभाजक, रस्त्याच्या बाजूला उपलब्ध जागेवर झाडे लावण्याचे नियोजन सुरू आहे. पहिल्या टप्प्यात शहरातील चऱ्हाटा फाटा ते शिवाजी महाराज चौकापर्यंत २० मीटर अंतरावर १ झाड लावण्याबाबत चर्चा झाली. या मोहिमेसाठी अधिकाधिक सामाजिक संघटनांना सहभागी करू, तसेच वैयक्तिक पातळीवर योगदान देणार असल्याचेही डॉ.योगेश क्षीरसागर यांनी सांगितले. त्यांनी राष्ट्रीय महामार्ग विभागाचे अभियंता राजेंद्र भोपळे यांच्याकडून वृक्ष लागवडीसाठी रस्त्याचा एक आराखडा मागविला आहे. या आराखड्यातून वृक्ष लावल्यानंतर रस्ता रुंदीकरण, विद्युत खांबांना अडथळा होऊ नये म्हणून ते तोडण्याची वेळ येणार नाही, या बाबी स्पष्ट होतील. या बैठकीस आयएमएचे जिल्हाध्यक्ष डॉ.अनंत मुळे, सचिव डॉ.अमोल गीते, रोटरी क्लब ऑफ मीडटाऊनचे सदस्य संतोष पडोळे, लक्ष्मण मळेकर यांच्यासह नर्सरी चालक, वृक्षप्रेमी नागरिकांची उपस्थिती होती.

## दौंड-इंदोर एक्सप्रेसला अहिल्यादेवी होळकरांचे नाव द्या
### खा.बजरंग सोनवणेंची केंद्रीय रेल्वेमंत्र्यांकडे मागणी

बीड: दौंड-इंदोर एक्सप्रेस गाडीला 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर एक्सप्रेस' असे नाव देण्यात यावे, तसेच या गाडीचा विस्तार अहिल्यानगर (अहमदनगर) पर्यंत करावा, अशी मागणी बीडचे खा.बजरंग सोनवणे यांनी केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांच्याकडे पत्राद्वारे केली आहे. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे योगदान महाराष्ट्र व मध्यप्रदेशासाठी अतुलनिय आहे. त्यांच्या स्मृतीस आदरांजली ठरावी आणि या भागातील प्रवाशांना अधिक सोयीचा रेल्वेमार्ग उपलब्ध व्हावा, हा यामागचा उद्देश आहे. केंद्रीय रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांना



दिलेल्या पत्रात म्हटले आहे, दौंड-इंदोर या रेल्वेगाडीस पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर एक्सप्रेस असे नाव देण्यात यावे, अहिल्यादेवी होळकर यांचे योगदान महाराष्ट्रासह मध्यप्रदेशसह अनेक राज्यात महत्वपूर्ण आहे. सदरील गाडीला अहिल्यादेवी यांचे नाव दिल्यास सदरील रेल्वेला नवी ओळख मिळेल. सदरील गाडी आता इंदोर ते दौंड अशी चालत आहे. सदरील गाडीचा विस्तार करून अहिल्यानगरपर्यंत करणे आवश्यक आहे. तसे झाल्यास मराठवाड्यातील यात्रेकरू भाविकांना याचा लाभ होईल. पुण्यश्लोक आहिल्सादेवींचे जन्मस्थान आहिल्यानगर जिल्ह्यात आहे. मराठवाड्यातील नागरिकांना थेट इंदोरला जाणे सोपे होईल. सदरील सेवा पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची जन्म जयंती ३१ मे रोजी येत असल्याने ३० मे २०२५ पासूनच सुरू करावी, यामुळे जन्मदिनानिमीत्त हा सन्मान ठरेल, असेही पत्रात म्हटले आहे.

## डाक अधिक्षक श्री.पाठक यांनी घेतली किनवट सहाय्यक जिल्हाधिकाऱ्यांची भेट

नांदेड प्रतिनिधी : बालाजी सिरसाट किनवट : उपविभाग अंतर्गत येणाऱ्या एकात्मिक आदिवासी प्रकल्प कार्यालय येथे डाक अधीक्षक नांदेड विभाग श्री.पाठक हे किनवट दौऱ्यावर असतांना त्यांनी सहाय्यक जिल्हाधिकारी तथा प्रकल्पाधिकारी झेनित दोनथुला यांची भेट



घेऊन भारतीय पोस्ट ऑफिसच्या आदिवासी भागामध्ये चालू असलेल्या विविध योजने बद्दल माहिती दिली व सर्व आदिवासी घटकापर्यंत पोस्ट ऑफिसच्या योजना जनतेला दारोदारी पोस्ट ऑफिसचे कर्मचारी नेहमी सेवा पोहोचतील अशी श्वासती दिली. तर सहाय्यक जिल्हाधिकारी यांनी पोस्ट ऑफिसच्या सर्व कर्मचाऱ्यांना व जनतेपर्यंत सेवा पोहोचवण्याकरिता योग्य ते सहकार्य करण्याची उत्सुकता दर्शवली. यावेळी डाक अधिक्षक श्री.पाठक किनव उपविभागीय अधिकारी माधव बारस्कर उपस्थित होते.

## जिल्ह्यातील पोलीस अधिकाऱ्यांच्या बदल्या

**बीड। प्रतिनिधी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीच्या तोंडावर कालावधी पूर्ण झालेल्या पोलीस आधिकाऱ्यांच्या अखेर बदल्या करण्यात आल्या आहेत. जिल्ह्यातून अनेक अधिकारी बाहेर जिल्ह्यात गेले असून काही अधिकारी त्यांच्या जागी बीड जिल्ह्यात येतं आहेत. बीड जिल्ह्यातून बदली झालेल्या अधिकाऱ्यांमध्ये पीएस आय राजेश पाटील छत्रपती संभाजी नगर ग्रामीण, रामेश्वर इंगळे छत्रपती संभाजी नगर ग्रामीण, बसवेश्वर छानशेट्टी धाराशिव, शिवाजी सर्जे धाराशिव, स्वप्निल भुजगुडे धाराशिव,शिला सोमवंशी धाराशिव, निशिगंधा खुळे धाराशिव, प्रमोद यादव छत्रपती संभाजी नगर ग्रामीण, राहुल पतंगे धाराशिव,वैभव सारंग छात्र पती संभाजी नगर ग्रामीणला गेले आहेत. तर रमेश घुले धाराशिव वरून बीड, प्रदीप ठूबे बीड,धाराशिव वरून पवन निबाळकर बीड ला येणार आहेत.पोलीस निरीक्षक मध्ये बीडवरून संतोष साबळे जालना, प्रशांत महाजन छत्रपती संभाजी नगर ग्रामीण,संतोष घोडके जालनाला गेले तर कस्तुरे यांना एक वर्ष मुदतवाढ मिळाली आहे. तर बाहेर जिल्ह्यातून पीआयमध्ये छत्रपती संभाजी नगर वरून किशोर पवार बीड,रमेश जायभाये जालना वरून बीड तर मुरलीधर खोकले छत्रपती संभाजी नगरवरून बीड ला आले आहेत. तर सहाय्यक पोलीस निरीक्षक यामध्ये बीडमधून चंद्रशेखर पवार छत्रपती संभाजी नगर ग्रामीण,संतोष मिसळे छत्रपती संभाजी नगर ग्रामीण,विजयसिंग जोनवाल छत्रपती संभाजी नगर ग्रामीणला गेले तर महेंद्र ठाकूर यांना १ वर्ष मुदतवाढ तर महेश क्षीरसागर धाराशिव वरून बीड ला येतं आहेत.**

**दरम्यान रिक्त झालेल्या ठाणेदारांच्या जागी आता पोलीस अधिक्षक कोणाला संधी देतात हे पाहणे महत्वाचे ठरणार आहे.**

# आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबियांना महिनाभरात मदत मिळणार
## जिल्हाधिकारी महिन्यातुन दोन वेळा बैठका घेणार ; पालकमंत्री अजितदादा कडुन आंदोलनाची दखल :- डॉ.गणेश ढवळे

बीड:-( दि.२९) अवकाळी पाऊस,नापिकी, कर्जबाजारीपणा आणि बँकाचा कर्ज परतफेडीचा तगादा या प्रमुख कारणांमुळे मनोधैर्य खचलेला शेतकरी आत्महत्येसारखे टोकाचे पाऊल उचलतो. आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या वारसांना १ लाख रुपयांची शासकीय मदत दिली जाते.बीड जिल्ह्यातील आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबीय शासकीय मदतीपासून वंचित असुन त्यांच्या कुटुंबीयांना शासनामार्फत दिली जाणारी १ लक्ष रुपये मदत वेळेवर मिळणे बंधनकारक असताना महिनोंमहिने शासनाने निधी उपलब्ध करून न दिल्याने कुटुंबांची परवड होत होती.त्यामुळे राज्याच्या तिजोरीच्या चाव्या हाती असणारे उपमुख्यमंत्री वित्त मंत्री तथा नियोजन मंत्री तथा पालकमंत्री बीड अजितदादा पवार यांनी निधी उपलब्ध करून देण्यात यावा यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर "अजितदादांच्या विकासाचे गाजरवाटप"आंदोलन करण्यात आले होते. या अनुषंगाने वारंवार पाठपुरावा केल्यानंतर अखेर पालकमंत्री बीड अजितदादा पवार यांनी याची दखल घेत आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबियांना शासकीय मदत देण्याच्या हेडवर निधी उपलब्ध नसल्यास ईतर हेडमधुन तो निधी शेतकऱ्यांच्या कुटुंबियांना देण्याचे निर्देश पालकमंत्री बीड यांनी जिल्हाधिकारी बीड विवेक जॉन्सन यांना दिल्याची माहिती काल दि.२८ बुधवार रोजी जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली कार्यालयात पार पडलेल्या बैठकीत दिली. जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन स्वतः शेतकरी आत्महत्येचे प्रकरण मार्गी लावण्यासाठी महिन्यातुन दोन बैठका घेणार असुन तालुकास्तरावरून तहसीलदारांना आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबियांचे प्रस्ताव १५ दिवसांत जिल्हा समितीकडे पाठवावे असुन याबरोबरच जिल्हास्तरीय समितीने पात्र केलेल्या कुटुंबियांना शासकीय मदत देण्याची प्रक्रिया पुढील १५ दिवसात पूर्ण केली जाणार असल्याने महिनाभरात आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबियांना आर्थिक मदत मिळणार असल्याची माहिती जिल्हाधिकारी विवेक जान्सन यांनी बैठकीत दिली.

बीड जिल्ह्यात १ जानेवारी २०२५ ते ३१ एप्रिल २०२५ या ४ महिन्यात ९२ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या असुन बीड जिल्ह्यातील पात्र ५५ आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबिय मदतीच्या प्रतिक्षेत आहेत. त्यांना तातडीने निधी देण्यात यावा या प्रमुख मागणीसाठी सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख बीड जिल्हा माहिती आधिकार कार्यकर्ता महासंघ महाराष्ट्र राज्य डॉ.गणेश ढवळे व त्यांचे सहकारी शेख युनुस,सुदाम तांदळे,शिवशर्मा शेलार, पांडुरंग हराळे,शेख मुस्ताक, रामनाथ खोड, माजी सैनिक अशोक येडे यांनी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर "अजितदादांचे विकासाचे गाजर वाटप" लक्ष्यवेधी आंदोलन करत आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या वारसांना शासकीय मदतनिधीची पालकमंत्री अजितदादा पवार यांनी तरतूद करावी अशी मागणी केली होती. या मागणीची दखल घेऊन पालकमंत्री बीड अजितदादा यांनी जिल्हाधिकारी बीड यांना आदेश दिले आहेत.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर
शुक्रवार ३० मे २०२५
https://lokaarambh.com



## संपादकीय

### जॉय चे कामात सातत्य... त्यामुळे कौतुक कराव तेवढं थोड

खरं तर आज लिहिण्यास कारण की, 'जॉय ऑफ गिव्हिंग' चा दहावा वर्धापन दिन...'जॉय ऑफ गिव्हिंग' हा शब्द जरी ऐकला तरी पटकन मनात येत ते म्हणजे श्री गणेश हिरवे सर जे परक्यांना सुद्धा आपल्या चतुरस्त्र व्यक्तिमत्त्वाने, नम्र स्वभावाने कधी आपलंस करून घेतात हे कळत सुद्धा नाही. वडिलांच्या शिक्षणाचा वारसा जपत, दुर्दम्य आत्मविश्वास, उत्तुंगतेचा ध्यास,अंगी निश्चयाचे बळ, मनी तीव्र महत्वकांक्षा आणि कठोर परिश्रम करण्याची तयारी असं शिक्षिकी पेशाला साजेसं व्यक्तीमत्व असून आयुष्यात अनेक अडचणी आल्या तरी त्यावर मात करून पुन्हा भरारी घेत विद्यार्थ्यांसमोर आदर्श स्वतः निर्माण करणारे शिक्षक.

त्यांनी सुरू केली 'जॉय ऑफ गिव्हिंग' संस्था म्हणजे अत्यंत सुंदर जिच्या अर्थ पुर्ण नावाची संस्था जी नावातच खूप काही आहेच. ती गेले दहा वर्षे सामाजिक काम (खरं तर त्या आधी पासूनच ) खूप अत्यंत धडाडीने करत आहे. ह्या संस्थेच्या प्रत्येक सभासदाचे ही कौतुकाची थाप कारण महाराष्ट्रातील विविध भागात शैक्षणिक, सांस्कृतिक, सामाजिक, प्रबोधनात्मक जे कार्यक्रम उपक्रम ह्या संस्थेच्या माध्यमातून झाले ते मी ही अनेक वेळा अगदी जवळून पाहिले. चांगले लोक चांगले विचार सामाजिक बांधिलकी म्हणून एकजुटीने जेव्हा समाजासाठी काही तरी करू इच्छितात तेव्हा त्यातून हिरवे सरांनी लावलेल्या ह्या जॉय च्या रोपट्याचा वटवृक्ष होतो. आदिवासी पाडे, आश्रम शाळा, अनाथालय, गोरं गरिबांची मुलं ह्यांना अनेक वेळा सुट्टी च्या दिवशी हिरवे सर आणि जॉय ची टिम स्वतः जाऊन शिकवतात सोबत च अनेक वेळा त्यांच्या चेहऱ्यावर आनंद फुलण्यासाठी शिधावाटप किंवा वह्या पुस्तके वाटप ही गेले अनेक वर्षे सातत्याने करतात. भेट म्हणून अनेकांना ते पुस्तके देतात. त्यात ते इतर सामाजिक कार्यकर्त्यांना तसेच समाज सेवेची आवड असलेल्यांना ही सोबत घेऊन प्रत्यक्ष घेऊन जातात. जेणेकरून काय काम करतो हे इतरांना ही कळेल आणि त्याच्या मध्ये ही ती आवड निर्माण होईल. तसेच क्षयरोग पिडीत कुटुंबाला हातभार म्हणून ही शिधावाटप करतात.अनेक वेळा स्वतः रक्तदान शिबिर घेतात तसेच ही सर्व टिम स्वतः ही रक्तदान करते. तसेच हे सगळं करायला आर्थिक पाठबळ ही महत्त्वाचे ते देणारे जॉय वर मुख्य म्हणजे हिरवे सरांवर विश्वास ठेवणारे अनेक देणगीदार ते ह्या संस्थेसाठी जणू देवदूतच जे स्वतः एखाद्या गरीब वस्तीत जाऊ शकत नाही पण आर्थिक हातभार लावत ह्या संस्थेच्या माध्यमातून सहकार्य करतात. तसेच सरांच्या सौ. योगिता हिरवे मॅडम ह्या देखील सरांच्या खांद्याला खांदा लावून तितक्याच महत्वाची भुमिका बजावतात.जॉय चा इतका मोठा डोलारा उभा झाला आहे. एकूण च ह्या संस्थेच्या वर्धापन दिनानिमित्त ह्या संस्थेचा यशस्वी कामगिरीचा आलेख दिवसेंदिवस उंचावत जाण्यासाठी ह्या संस्थेत असेच कायम सातत्य, निष्ठा आणि पारदर्शकता राहो ह्या सदिच्छा तसेच सर्व सभासद, कार्यकर्ते, पदाधिकाऱ्यांचे आणि मुख्य म्हणजे हिरवे सरांचे मनःपूर्वक अभिनंदन आणि पुढील वाटचालीसाठी अनंत शुभेच्छा.

# पाणीदार नेते – आदरणीय श्री. अमरसिंह पंडित साहेब

बीड जिल्ह्यातील गेवराई तालुका म्हणजे शेतीप्रधान परंतु अनेक अडचणींनी ग्रासलेला भाग व या अडचणींना मात देणारे एक नाव या भागात गेल्या काही वर्षात विशेष उठून दिसतं ते म्हणजे गेवराई तालुक्याचे माजी आमदार व जय भवानी सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन आदरणीय श्री.अमरसिंह पंडित साहेब. पाणी , शेती , समाजकारण , आणि राजकारण या सगळ्या क्षेत्रात सक्रिय राहून त्यांनी समाजासाठी झटण्याचा आदर्श घालून दिला आहे. विशेष म्हणजे गेवराई तालुक्यातील श्री.अमरसिंह पंडित साहेब हे नाव आता पाण्यासाठी झगडणाऱ्या नेतृत्वाचं प्रतीक बनलं आहे. गेल्या काही दशकात गेवराई तालुक्यात दुष्काळ हे मोठ संकट होतं. दुष्काळाच्या झळा सोसत असलेल्या या भागात आदरणीय साहेबांनी पाण्याचे व्यवस्थापन आणि विकास घडवून आणत "पाणीदार नेता" म्हणून एक वेगळी ओळख निर्माण केली आहे.

साहेबांनी प्रकल्प जलशारदा व जलयुक्त शिवार योजने अंतर्गत गावोगावी बंधारे ,खोदकाम,शेततळी , गाळ काढणे अशी कामे उभी केली. मा.श्री.अमरसिंह पंडित साहेब यांना समजलं होतं की शेती, आरोग्य शिक्षण या सगळ्यांच्या मुळाशी पाणी आहे. त्यांनी जलसंधारणाच्या कामांना प्राधान्य दिलं. याचं सद्यस्थितीतील जिवंत उदाहरण म्हणजे सिंदफना नदी पात्रात नऊ ठिकाणी नाथापुर, खुंड्रस, दगडगाव, टाकळगाव, इटकुर, अंकुटा, नामलगाव येथे बंधारे व्हावेत यासाठी असलेली त्यांची धडपड व प्रयत्न. साहेबांनी या प्रकल्पाचा वेळोवेळी शासन दरबारी पाठपुरावा करून शासनाची मंजुरी मिळवली. आज गेवराई तालुक्यात श्रध्देय अमरसिंह पंडित साहेबांच्या पुढाकाराने उभारलेले सुमारे 25 लघु बंधारे हे शेतीला वर्षभर पाणी देतात. या बंधाऱ्यांनी केवळ पाणी साठवून ठेवलं नाही तर भूजल पातळी वाढवली. विहिरींना पुन्हा जन्म दिला आणि शेतकऱ्यांना खरीपासोबत रब्बी हंगामातही पीक घेण्यास सक्षम केलं. आज गावात पाणी कमी असतानाही अनेक विहिरींना पाणी आहे याचे श्रेय त्यांच्याच कामाला जातं.

साहेबांचा दृष्टिकोन केवळ तांत्रिक नसून तो मानवी आहे. त्यामुळे त्यांचे नेतृत्व अधिक सशक्त आणि समावेशक ठरते. बंधाऱ्यांमुळे पाणी साचलं आणि पाण्यामुळे शेती फुलली. आदरणीय साहेब हे केवळ सामाजिक कार्यकर्ते नाहीत तर ते एक असा पाणीदार नेता आहेत ज्यांनी पाण्याच्या प्रत्येक थेंबाला विकासाचं रूप दिलं. गेवराई तालुक्याला दुष्काळाच्या छायेतून हिरवळीच्या दिशेने घेऊन जाणाऱ्या या नेत्याचे योगदान अनुकरणीय आहे.

आदरणीय अमरसिंह पंडित साहेबांनी शाश्वत शेतीच्या दिशेने लोकांचे लक्ष वेधून घेतलं. त्यांनी 2023 या सालात ऊस विकास परिषद, जागर सेंद्रिय शेतीचा, बळीराजाच्या प्रश्नासाठी संघर्ष, मोसंबी विकास परिषद या उपक्रमांच्या माध्यमांतून शेतकरी बांधवांना प्रोत्साहित केले. त्यामुळे तालुक्यातील बरेच शेतकरी हे फळ लागवडीकडे वळले. यामुळे तालुक्यामध्ये बऱ्याच प्रमाणात मोसंबी लागवड झाली. तसेच जय भवानी सहकारी साखर कारखाना हा प्रभावीपणे चालवत वाढवलेली ऊस लागवड.

त्याचं जिवंत उदाहरण म्हणजे गेवराई तालुक्यातील असलेलं माझं गाव शिरसमार्ग या गावात पूर्वी उन्हाळ्यामध्ये पाणी प्रश्न बिकट होता.सिंदफणा नदी गावातून वाहत असली तरी पाण्याची अडवणूक नसल्यामुळे नदीचं पाणी थेट वाहून जायचं परंतु आदरणीय अमरसिंह पंडित साहेब यांच्या पुढाकाराने या नदीवर बांधलेला बंधारा हे गावाच्या परिवर्तनाचं मुख्य कारण ठरलं. साहेबांनी सिंदफणा नदीच्या प्रवाहावर एक स्थायी बंधारा उभारण्याचे स्वप्न पाहिलं आणि ते प्रत्यक्षात उतरवलं. या बंधाऱ्यामुळे नदीचे पाणी अडवले गेले.भूजल पातळी वाढली आणि शिरसमार्ग व पंचक्रोशीतील विहिरींमध्ये बारमाही पाणी उपलब्ध होऊ लागलं. यामुळे गावातील पाणीटंचाई मोठ्या प्रमाणात कमी झाली. पाण्याच्या उपलब्धतेमुळे शेतकऱ्यांनी पारंपरिक पिकांच्या ऐवजी मोसंबी लागवडीकडे वळण्यास सुरुवात केली. पूर्वी कर्जबाजारी असलेले अनेक शेतकरी आता मोसंबीच्या उत्पन्नातून स्वतंत्र आर्थिक निर्णय घेऊ लागले यामुळे गावची व परिसरातील नागरिकांची आर्थिक परिस्थिती झपाट्याने बदलली. त्यांच्या जीवनशैलीत स्पष्ट बदल दिसून येतो.पक्की घरी , शिक्षणावर खर्च , शेतीसाठी नवीन तंत्रज्ञानाचा वापर आणि सण समारंभामधील सहभाग वाढलेला आहे. याचं श्रेय संपूर्णतः आदरणीय श्री अमरसिंह पंडित साहेब यांना जातं. साहेबांचं नेतृत्व म्हणजे विकासासाठी समर्पण आणि दूरदृष्टी याचं सुंदर मिश्रण त्यांनी केवळ बंधारा उभारला नाही, तर त्या पाण्याचा शाश्वत वापर करून गावाचं अर्थचक्र बदलून टाकलं.



त्यामुळे शिरसमार्ग हे गाव आज "नदीकाठचं समृद्ध गाव" म्हणून ओळखलं जातं.

साहेबांचे कार्य हे सिद्ध करतं की योग्य नियोजन आणि सकारात्मक नेतृत्व यामुळे एखादं गाव आत्मनिर्भर आणि समृद्ध होऊ शकतं. सिंदफणा नदीवरील बंधारा हा केवळ एक जलसाठा नाही तर परिवर्तनाचे प्रतीक आहे आणि मा.श्री अमरसिंह पंडित साहेब हे त्या परिवर्तनाचे शिल्पकार. साहेब आणखी सिंदफणा नदी पात्रात नऊ बंधारे व्हावेत यासाठी प्रयत्नशील आहेत आणि हे बंधारे पूर्ण झाल्या नंतर सिरसमार्ग प्रमाणेच त्या बंधाऱ्याच्या काठची गावे ही देखील आणखी समृद्ध होतील.

फक्त शेतीपूरतेच मर्यादित न राहता साहेबांनी त्यांचे कार्य समाजाच्या प्रत्येक थरापर्यंत पोहोचवले आहे. त्यांनी तालुक्यातच युवा पिढीला चांगल्या दर्जाचे शिक्षण मिळावे यासाठी सुरू केलेल्या शिक्षण संस्था. शिक्षणाबरोबरच विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास व्हावा यासाठी शाळा , विद्यालयांमध्ये वेळोवेळी राबवलेले विविध उपक्रम. सामाजिक जीवनात जनतेला मदतीच्या हेतूने शारदा प्रतिष्ठानच्या मार्फत आयोजित केलेले सामायिक विवाह सोहळे , युवकांसाठी स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र , वृद्धांसाठी आरोग्य तपासणी शिबिरे , अपंगांसाठी कृत्रिम हाथ , पाय अवयव वाटप आयोजित केलेले आहेत.या माध्यमातुन साहेब सतत जनकल्याणकारी कार्य करत आहेत.

आदरणीय अमरसिंह पंडित साहेबांनी राजकारणात प्रवेश हा केवळ पदासाठी नव्हे, तर लोकांच्या समस्यांना थेट प्रशासनापर्यंत पोहोचविण्यासाठी केला. लोककल्याणकारी कार्य करण्याचा वारसा साहेबांनी आदरणीय दादांकडून घेतं पंचायत समिती, जिह्ला परिषद, विधानसभा यांमध्ये नेतृत्व करत तालुक्यांतील नागरिकांचे प्रश्न सोडवले व आजतागायत सोडवत आहेत.पारदर्शक कामकाज निधीचा योग्य वापर आणि लोकांचा सहभाग यावर त्यांनी नेहमी भर दिला त्यांचं नेतृत्व हे विकासाभिमुख आणि लोककेंद्रीत आहे.

आदरणीय श्री.अमरसिंह पंडित साहेब हे केवळ एक नाव नाही तर एक चळवळ आहे पाण्याच्या थेंबापासून ते लोकांच्या आत्मविश्वासापर्यंत सगळं जपणारी.

गेवराई तालुक्याला जिथं विकासाची गरज आहे तिथं आदरणीय अमरसिंह पंडित साहेब व शिवछत्र परिवार तालुक्यासाठी खरी आशा आहे.

साहेबांच्या जनकल्याणकारी कार्याविषयी बोलण्यासारखे, लिहण्यासारखे आणखी भरपूर आहे. त्यांच्या जन्मदिनाच्या निमित्ताने मी माझ्या मनातील त्यांच्या विषयी असलेल्या आदरयुक्त भावना व्यक्त करण्याचा प्रयत्न केला आहे. आदरणीय साहेबांना जन्मदिनाच्या लक्ष लक्ष शुभेच्छा.

**लेखक**
**प्रा.अजय पांडुरंग रत्नपारखे**
**उच्च माध्यमिक विद्यालय पाचेगाव**

# ज्या दिवशी जरांगे मुंबईत उपोषणाला बसतील त्याच दिवशी: लक्ष्मण हाकेंची मोठी घोषणा

ओबीसी नेते लक्ष्मण हाके यांनी पुन्हा एकदा ओबीसी आरक्षणाच्या मुद्द्यावरून मराठा आरक्षण आंदोलक मनोज जरांगे पाटील यांच्यावर जोरदार हल्लाबोल केला आहे. तसचे आगामी निवडणुकीत ओबीसीतील कुणब्यांचे बोगस दाखले घेऊन काही आरक्षण चोरमंडळी निवडणुकीला उभे राहिले तर त्यांना खड्यासारखे बाजूला काढा आणि जो खरा ओबीसी आहे त्याला निवडून द्या असं आवानही यावेळी लक्ष्मण हाके यांनी केलं. नेमकं काय म्हणाले हाके? ज्या दिवशी मनोज जरांगे नावाचा माणूस मुंबई येथे उपोषणाला बसेल, त्याच दिवशी आम्ही नांदेड जिल्ह्यातील माळेगाव येथे खंडोबाला ओबीसीच्या वतीने नारळ फोडून माळेगाव ते मुंबई लॉंग मार्च काढणार आहोत, या माध्यमातून आम्ही गावगाड्यातील ओबीसी समुहाला एकत्र आणणार आहोत. आपले ओबीसीचे न्याय हक्क टिकले पाहिजे यासाठी जनजागृती करणार त्यासाठी राज्यभर सभा घेणार, असं हाके यांनी म्हटलं आहे. दरम्यान यावेळी बोलताना हाके यांनी पवार कुटुंबावर देखील जोरदार हल्लाबोल केला आहे. जे पवार कुटुंब मनोज जरांगे यांना आंदोलन करायला लावतं, सगळी रसद पुरवतं, त्याच पवरांचे जर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस कौतुक करणार असतील तर आम्हाला चालणार नाही, लढायला आम्ही आणि जेवायला पवार हे कदापीही चालणार नाही, असा इशारा यावेळी हाके यांनी दिला आहे. पवार, देशमुख यांच्यासारख्या मोठ्या कारखानदार लोकांनी ओबीसीवर अन्याय केला, म्हणून आम्ही भाजपाला स्वीकारले आहे. इथून पुढच्या काळात राज्याचा मुख्यमंत्री देखील ओबीसीच ठरवेल, असंही ते यावेळी म्हणाले आहेत. यावेळी बोलताना त्यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यावर देखील हल्लाबोल केला आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार हे गोचिडासारखं अर्थ खात्याला चिटकून





बसले आहेत. अजितदादा पवार हे सामाजिक असंवेदनशील माणूस आहेत, सत्तेतून पैसा आणि पैशातून सत्ता असा हा माणूस आहे. अजित पवार हे आम्हाला कधीच जवळचे वाटले नाहीत, त्यामुळे देवेंद्र फडणवीस साहेब आम्ही तुमच्याकडे बघून मतदान केले आहे, तुम्हांला मुख्यमंत्री केले आहे आम्हला वाऱ्यावर सोडू नका, असं हाके यांनी म्हटलं. धनगर समाजाचा निधी अजित पवार यांनी अडवला म्हणून तक्रार करणार आहे, जर मुख्यमंत्री यांनी तक्रार ऐकूण घेतली नाही तर राज्याचा मुख्यमंत्री आता ओबीसी ठरवणार आहे, हे लक्षात ठेवावे, जरांगे यांना लोकशाही कळत नाही, जरांगे हे लोकशाहीचा अनादर करणारे आहेत. ते ओबीसीचा आणि छगन भुजबळ यांचा तिरस्कार करतात, असा हल्लाबोलही यावेळी हाके यांनी केला आहे.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर
शुक्रवार ३० मे २०२५
https://lokaarambh.com



### 20 वर्ष सेवा केलेल्या कर्मचाऱ्यांना हक्काच्या पेन्शनसाठी पुढाकार

## जी.पी.एफ. खाते उघडण्यासाठी प्रस्ताव सादर



प्रतिनिधी | बासमत, हिंगोली | २९ मे २०२५ शासनाच्या सेवेत तब्बल २० वर्षांहून अधिक काळ कार्यरत असलेल्या शिक्षक व कर्मचाऱ्यांना हक्काची पेन्शन सुविधा मिळावी, यासाठी महत्त्वपूर्ण पाऊल उचलण्यात आले आहे. जी.पी. एफ. (सामान्य भविष्य निर्वाह निधी) खाते उघडण्याबाबतचा प्रस्ताव आज जिल्हा शिक्षणाधिकारी कार्यालयात सादर करण्यात आला. या वेळी शिक्षणाधिकारी, जिल्हा परिषद, हिंगोली यांना शिक्षक प्रतिनिधींच्या उपस्थितीत अधिकृत स्वरूपात प्रस्ताव सुपूर्द करण्यात आला. सेवेतील दीर्घकाळ पूर्ण करूनही अनेक कर्मचाऱ्यांना जी.पी.एफ. खात्याचा लाभ मिळत नसल्याने, त्यांच्या निवृत्तीनंतरच्या सुरक्षेच्या दृष्टिकोनातून ही मागणी केली गेली आहे. यावेळी प्रा. लोंडे सर आणि इतर शिक्षक उपस्थित होते. प्रस्ताव सादर करताना त्यांनी सांगितले की, "दिर्घ सेवेनंतरही कर्मचाऱ्यांना न्याय मिळावा, हे आमचे ध्येय असून यासाठी सातत्याने प्रयत्न केले जातील." हा प्रस्ताव पुढे सकारात्मक पावले टाकण्यासाठी एक महत्त्वाचा टप्पा ठरणार असून, शिक्षक व कर्मचाऱ्यांच्या हक्कासाठीचा लढा आणखी बळकट होईल, असा विश्वास व्यक्त करण्यात येत आहे.

## धरम तलावात युवकाचा बुडून मृत्यू धाडसी तरुणांच्या मदतीने मृतदेह बाहेर



प्रतिनिधी | खुलताबाद | २९ मे २०२५ खुलताबाद शहरातील प्रसिद्ध धरम तलावात पाण्यात बुडून एका युवकाचा मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना घडली. मृत युवकाचे नाव शेख सादिक (वय २२, रा. फकीरवाडा, खुलताबाद) असे आहे. प्राप्त माहितीनुसार, शेख सादिक काही मित्रांसोबत तलावाजवळ गेला असताना, पाण्यात उतरला आणि खोल भागात जाऊन बुडाला. तात्काळ मदत न मिळाल्यामुळे त्याचा मृत्यू झाला. घटनेनंतर परिसरात खळबळ उडाली. त्यानंतर काही धाडसी तरुणांनी धाडस दाखवत पाण्यात उतरून मृतदेह शोधून बाहेर काढला. पोलिसांनी घटनास्थळी पोहोचून पंचनामा केला असून, मृतदेह पुढील तपासासाठी शवविच्छेदनासाठी पाठवण्यात आला आहे. या दुर्घटनेमुळे खुलताबाद शहरात हळहळ व्यक्त होत असून, नागरिकांनी तलाव परिसरात सुरक्षिततेच्या दृष्टीने उपाययोजना करण्याची मागणी केली आहे. दैनिक प्रजा-शासन मृत युवकास श्रद्धांजली अर्पण करतो आणि कुटुंबियांच्या दुःखात सहभागी होतो.

## मुख्याध्यापकाचे आगळेवेगळे पाऊल: टॉपर विद्यार्थ्यांना विमान प्रवासाची अनोखी भेट



प्रतिनिधी | पेडापल्ली, तेलंगणा | २९ मे २०२५ पेडापल्ली (तेलंगणा) येथील बेगमपेट हायस्कूल मधील मुख्याध्यापक माळका रामकिशन राव यांनी विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी असा अनोखा उपक्रम राबवला आहे. आपल्या शाळेतील इयत्ता दहावीचे दोन टॉपर विद्यार्थी पागळा रसिथा (५५८ गुण) आणि श्रीमंथुला रोहिता (५५७ गुण) यांना त्यांनी विशाखापट्टणम (आंध्र प्रदेश) येथे खास विमान प्रवास करून सहलीसाठी नेले. या दोन्ही विद्यार्थ्यांनी संपूर्ण मंडलमध्ये अव्वल कामगिरी केली होती. त्यांच्या यशाचे कौतुक करत, पुढील आयुष्यासाठी प्रेरणा मिळावी या उद्देशाने मुख्याध्यापकांनी आपल्या खासगी खर्चातून ही संपूर्ण सहल प्रायोजित केली. विशेष म्हणजे, हा दोघांचाही पहिलाच विमान प्रवास होता. विमानात बसल्याचा अनुभव, आकाशात उडताना वाटलेला थरार, आणि विशाखापट्टणमच्या पर्यटनस्थळांचा आनंद यामुळे विद्यार्थी हरखून गेले. त्यांच्या डोळ्यातील चमक आणि चेहऱ्यावरचे आनंदाचे हास्य पाहून उपस्थित शिक्षक आणि पालक यांच्याही डोळ्यांत आनंदाश्रू उभे राहिले. मुख्याध्यापक रामकिशन राव यांनी सांगितले की, "चांगल्या अभ्यासाला फक्त गुणांचे बक्षीस नव्हे तर अनुभवाचेही बक्षीस मिळाले पाहिजे. अशा उपक्रमातून इतर विद्यार्थ्यांनाही प्रेरणा मिळेल." या आगळ्यावेगळ्या उपक्रमाची सर्वत्र प्रशंसा होत आहे. शिक्षक म्हणून केवळ अध्यापन न करता विद्यार्थ्यांच्या मनात आत्मविश्वास आणि प्रेरणेचे बीज रोवणारे हे उदाहरण निश्चितच अनुकरणीय ठरत आहे. प्रजा-शासन तर्फे माळका रामकिशन राव सर आणि या टॉपर विद्यार्थ्यांचे मनःपूर्वक अभिनंदन!

# आता मन:शांतीचा निर्णय! धनंजय मुंडे नाशिकमध्ये नेमकं काय करतायत? महत्त्वाची माहिती समोर!

आपल्या मंत्रिपदाचा राजीनामा दिल्यापासून राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते धनंजय मुंडे हे फारसे चर्चेत नाहीयेत. संतोष देशमुख यांच्या हत्येत त्यांच्या जवळची व्यक्ती वाल्मिक कराड याचे नाव आल्याने त्यांना आपल्या मंत्रिपदाचा राजीनामा द्यावा लागला. याच काळात मुंडे यांना आरोग्यविषयक समस्यांनाही तोंड द्यावे लागले. त्यांना बेल्स पाल्सी हा दुर्मिळ आजार झाला आहे. असे असतानाच आता धनंजय मुंडे हे नाशिकच्या विपश्यना केंद्रात विपश्यना करत असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे.

धनंजय मुंडे यांचे सध्या प्रकृतीकडे लक्ष

मुंडे यांनी आपल्या मंत्रिपदाचा राजीनामा दिल्यानंतर त्यांच्या खात्याची जबाबदारी आता राष्ट्रवादीचे नेते छगन भुजबळ यांच्यावर सोपवण्यात आली आहे. काही दिवसांपूर्वीच त्यांचा शपथविधी झाला आहे. सध्या भुजबळ हे अन्न व नागरी पुरवठा खात्याचे मंत्री आहेत. दरम्यान, दुसरीकडे आरोग्याच्या समस्येतून जात असल्याने धनंजय मुंडे पहिल्यासारखे सक्रिय नाहीत. त्यांनी आपल्या प्रकृतीकडे लक्ष दिले आहे. मधल्या काळात धनंजय मुंडे यांच्या दोन्ही डोळ्यांवर शस्त्रक्रिया झाली होती. त्यानंतर काही दिवसातच त्यांना बेल्स पाल्सी या दुर्मिळ आजाराने ग्रासले. विविध उपचार घेऊनही अद्याप धनंजय मुंडे यांच्या प्रकृतीत हवी तितकी सुधारणा झालेली नाही.

विपश्यना करण्याचा निर्णय वाल्मिक कराडमुळे मुंडे यांच्यावर झालेल्या आरोपामुळे त्यांना विरोधकांनी लक्ष्य केलं होतं. आता मात्र मंत्रिपदावरून दूर झाल्यानंतर त्यांनी मन:शांतीसाठी काम करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळेच धनंजय मुंडे यांनी इगतपुरी येथील सुप्रसिध्द विपश्यना केंद्रात जाऊन विपश्यना करण्याचा निर्णय घेतला आहे. आठ दिवसांपासून ते त्या ठिकाणी ध्यानधारणा करत असल्याचे त्यांच्या निकटवर्तीयांकडून सांगण्यात आले आहे.दोन तारखेपासून पुन्हा कामाला लागणार सलग दहा दिवस त्यांचा हा कार्यक्रम असल्याचे समजते त्यापैकी आठ दिवस पूर्ण झाले असून ते आपली ध्यानसाधना पूर्ण करून दोन तारखेपासून पुन्हा कामाला लागणार असल्याचे त्यांचे कार्यालयाच्या वतीने सांगण्यात आले आहे.

# गर्भवती हरिणीवर कुत्र्यांचा हल्ला ; हरिणीला वाचविण्याचे प्रयत्न निष्फळ :- डॉ.गणेश ढवळे

लिंबागणेश:- ( दि.२९ ) बीड तालुक्यातील लिंबागणेश येथील शेतकरी प्रजित प्रताप भोंडवे यांच्या शेतातील घरामागे सकाळी ७ वाजता कुत्र्यांच्या भुंकण्याचा गोंगाट ऐकु आला. प्रताप व प्रजित बापलेकांनी धाव घेतली असता त्याठिकाणी हरणांवर कुत्र्यांचा कळप हल्ला चढवताना दिसला. त्यांनी कुत्र्यांच्या तावडीतून हरणाची सुटका करत तिला पाणी पाजले आणि डॉ.गणेश ढवळे यांच्या घरी बैलगाडीत टाकुन आणले. डॉ.गणेश ढवळे यांनी लिंबागणेश येथील पशुवैद्यकीय अधिकारी डॉ.अर्जुन पवार यांना बोलावून घेतले. वनविभागाचे कर्मचारी यांना फोनवरून कल्पना दिली. डॉ.अर्जुन पवार,



परिचर सुधाकर देशमुख यांनी गर्भवती हरणीवर उपचार करून वाचवण्याचे प्रयत्न केले परंतु कुत्र्यांनी हरणीच्या मानेवर व ईतर ठिकाणी गंभीर चावे घेतल्यामुळे हरिणीने प्राण सोडले. वनविभागाचे कर्मचारी वनरक्षक महेश मेटे , वनकर्मचारी अनिल शेळके, गौतम वीर, हनुमंत वायभट, मधुकर वायभट वनविभागाची गाडी घेऊन लिंबागणेश येथे पोहोचले. हरिणीला त्यांच्या ताब्यात दिले. गर्भवती हरिणी असल्याने लिंबागणेश येथील पशुवैद्यकीय दवाखान्यात पोस्टमार्टेम करून हरीणीच्या गर्भातील पाडसाला वाचवण्याचा प्रयत्न डॉ.अर्जुन पवार व परीचर सुधाकर वैद्य यांनी केला परंतु दुर्दैवाने मृतावस्थेत आढळून आले. मृत हरणीचे शरीर वनविभाग कर्मचाऱ्यांच्या हवाली करण्यात आले. गर्भवती हरिणीला वाचविण्यात शेतकरी पुत्र प्रजित भोंडवे आणि पशुवैद्यकीय अधिकारी डॉ.अर्जुन पवार यांचे निकराचे प्रयत्न निष्फळ ठरले.

# 'मराठी व्यक्तीने उद्योगात उतरायचे नाही का?', हॉटेल प्रकरणात आरोप झाल्यानंतर संजय शिरसाट यांचा सवाल

सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट यांच्या मुलाने छत्रपती संभाजीनगरातील हॉटेल विट्स लिलाव प्रक्रियेतून घेतले. या हॉटेलची किंमत ११० कोटी होती, परंतु ते केवळ ६७ कोटी रुपयांत विकण्यात आल्याचा आरोप शिवसेना ठाकरे गटाचे नेते संजय राऊत यांनी केला होता. या व्यवहारातून त्यांनी मंत्री संजय शिरसाट यांना घेरले होते. त्याला गुरुवारी संजय शिरसाट यांनी उत्तर दिले आहे. लिलाव प्रक्रिया पूर्णपणे कायदेशीर आहे. ज्यांची रात्रीची दारू उतरत नाही, ते असे बोलतात, असे संजय राऊत यांचे नाव न घेता शिरसाट यांनी म्हटले. संजय शिरसाट म्हणाले, हॉटेलची संपूर्ण लिलाव प्रक्रिया कायदेशीर आहे. बोली लावताना डिपॉझिट भरावे लागते. ते भरल्यानंतर लिलाव प्रक्रियेत भाग घेतला. आता एका महिन्यात २५ टक्के रक्कम भरावी लागणार आहे. त्यानंतर बँकेची प्रक्रिया पार पाडत तीन महिन्यांत उर्वरित पैसे भरावे लागतील. मगच संपूर्ण व्यवहार पूर्ण होतील. या संपूर्ण लिलाव प्रक्रियेत सर्व व्यवहार कायदेशीर झाले आहे. परंतु दलालांनी बदनाम करण्याचे काम सुरु केले. रात्रीची ज्याची दारू उतरत नाही, ते असे बोलत असतात, असा टोला संजय शिरसाट यांनी नाव न घेता लगावला. संजय शिससाट यांनी सांगितले की, मी सांगतो त्यावर विश्वास ठेऊ नका. या संपूर्ण प्रकरणाची प्रशासकीय माहिती काढा. या हॉटेलच्या लिलावाची ही सातवी वेळ होती. मराठी व्यक्तीचे नाव घेताना लाज वाटत नाही का? मराठी माणसांना पाठिंबा देण्याऐवजी त्यांचे पाय ओढले जात आहेत. त्यांचे मनपात जे दलाल होते, त्यात एकही मराठी व्यक्ती नव्हता. व्यक्तीने राजकारण करावे, पण इतक्या खालच्या स्तरावर राजकारण करु नये. या प्रकरणात कशी सूत्र फिरली, मला बदनाम करण्याचा कसा प्रयत्न झाला, या सर्व प्रश्नांची उत्तरे मी योग्य वेळी देईल, असे त्यांनी म्हटले. सन २०१२ च्या मूल्यांकन अहवालानुसार या हॉटेलची किंमत ११० कोटी रुपये होती. आता २०२५ मध्ये त्यात आणखी वाढ झाली असेल. मग ते केवळ ६७ कोटी रुपयांत कसे विकले, असा सवाल राऊत यांनी केला.

# पाकिस्तानसाठी हेरगिरी, ठाण्यातून तिघे ताब्यात, ATS ची कारवाई

पहलगाम हल्ल्यानंतर भारताच्या तपास संस्थांनी पाकिस्तानी हेरगिरीचा आरोप असणाऱ्या अनेकांना ताब्यात घेतलंय. मूळची हरियाणाची यूट्यूबर ज्योती मल्होत्रा हीदेखील त्यापैकीच एक आहे. दरम्यान, आता याच तपास संस्था आता महाराष्ट्रापर्यंत पोहोचल्या आहेत. मिळालेल्या माहितीनुसार भारताची संवेदनशील माहिती पाकिस्तानला पुरवणाऱ्या महाराष्ट्रातील तिघांना एटीएसने पकडले आहे. घरभेद्यांना पकडण्याच्या मोहिमेत राष्ट्रीय तपास संस्थांना हे मोठे यश मिळाल्याचे म्हटले जात आहे. या तिघांपैकी दोघांची चौकशी करून त्यांना सोडून देण्यात आलं आहे. सध्या एक आरोपी एटीएसच्या ताब्यात असून त्याची कसूनच चौकशी केली जात आहे. भारताची माहिती पाकिस्तानला पुरवल्याचा आरोप मिळालेल्या माहितीनुसार दहसतवाद विरोधी पथक म्हणजेच एटीएसने महाराष्ट्रातून एकूण तीन कथित हेरांना पकडले आहे. त्यांनी भारताची माहिती पाकिस्तानला पुरवल्याचा आरोप आहे. हे तिन्ही आरोप पाकिस्तान इन्टेलिजेन्स ऑफिसच्या (पीआयसी) संपर्कात होते, असा एटीएसला संशल आहे. तसेच 2023 साली झालेल्या देशविरोधी कृत्यांमध्येही त्यांचा सहभाग होता, असे बोलले जात आहे. भारताची गुप्त माहिती पाकिस्तानला दिली... या तिघांना ताब्यात घेतल्यानंतर सुरुवातीच्या तपासात अनेक धक्कादायक बाबी समोर आल्या आहेत. या आरोपींनी एका पाकिस्तानी महिला एजेंटने फेसबुकच्या माध्यमातून हनी ट्रॅपमध्ये फसवलं. त्यानंतर तिने भारताविषयीची गुप्त माहिती मिळवली.





एटीएसच्या सांगण्यानुसार नोव्हेंबर 2024 ते मार्च 2025 या काळात व्हॉट्सअॅपच्या माध्यमातून भारताची सैन्य संरचना तसेच इतर महत्त्वाची माहिती पाकिस्तानला दिल्याची माहिती आहे. दोघांना चौकशीनंतर सोडून दिलं ठाण्यातील एटीएसने गुप्त माहिती मिळाल्यानंतर ही कारवाई केली. आरोपीसोबत इतर दोघांनाही एटीएसच्या अधिकाऱ्यांनी ताब्यात घेतलं होतं. चौकशी करून नंतर त्यांना सोडून देण्यात आलं. भविष्यात त्यांना पुन्हा एकदा बोलवलं जाण्याची शक्यता आहे. सूत्रांच्या माहितिनुसार अटक करण्यात आलेली व्यक्ती मुंबईच्या एका महत्त्वाच्या संस्थेत काम करत होती. महिला नागपुरात आली, मात्र... दरम्यान, नागपूरची एक महिला एलओसी क्रॉस करून पाकिस्तानात गेली होती. त्यानंतर पाकिस्तानी लष्कराने तिला परत भारताकडे सोपवले. आता ही महिला तिच्या घरी नागपुरात आली आहे. मात्र तिने तिचा मोबाईल पूर्णपणे फॉरमॅट केला आहे. त्यामुळे तपास संस्थांचा संशय बळावला आहे. देशातील वेगवेगळ्या तपास संस्था आता तिची चौकशी करणार आहेत.

# पहिल्याच पावसात केईएम रुग्णालयात पाणी साचलं हाय कोर्टाकडून गंभीर दखल, बीएमसीला नोटीस

मुंबईमध्ये दोन दिवसांपूर्वी मुसळधार पाऊस झाला, या पावसाचा मोठा फटका हा मुंबईकरांना बसला, पहिल्याच पावसामध्ये मुंबईतील अनेक भागांमध्ये पाणी साचलं. रेल्वे ट्रॅकवर पाणी साचल्यामुळे रेल्वे वाहतूक कोलमडल्याचं पाहायला मिळालं, तसेच अनेक सखल भागांमध्ये रस्त्यावर पाणी साचल्यानं याचा परिणाम हा रस्ते वाहतुकीवर देखील झाला. विशेष म्हणजे या पावसाचा फटका हा केईएम सारख्या बड्या रुग्णालयालाही बसला, पावसामुळे रुग्णालय परिसरात पाण्याचं तळ साचल्याचं पाहायला मिळालं, आता या प्रकरणाची गंभीर दखल मुंबई हाय कोर्टाकडून घेण्यात आली आहे. या प्रकरणात न्यायालयानं मुंबई महापालिकेला नोटीस जारी केली आहे. नेमकं काय आहे प्रकरण? मुंबईमधील केईएम सारखं गजबजलेलं रुग्णालयही पावसाच्या तडाख्यातून वाचू शकलं नाही, पहिल्याच पावसात रुग्णालयात पाण्याचं तळं साचल्याचं पाहायला मिळालं. या प्रकरणाची गंभीर दखल आता मुंबई हाय कोर्टाकडून घेण्यात आली आहे. सुमोटो याचिकेवर सुनावणी करताना मुंबई हाय कोर्टाकडून मुंबई महापालिकेला नोटीस पाठवण्यात आली आहे. पहिल्याच पावसामध्ये मुंबईमधील केईमए सारख्या 24 तास गजबलेल्या महपालिका रुग्णालयात तळं साचल्याचं पाहायला मिळालं. त्यामुळे रुग्णालयात आलेल्या रुग्णांच्या नातेवाईकांचे चांगलेच हाल झाले. या प्रकरणाची मुंबई हाय कोर्टानं गंभीर दखल घेतली आहे. मुंबई महानगर पालिकेच्या रुग्णालयातील हे चित्र फारच विदारक आणि चिंतेत टाकणारं असल्याचं वकील मोहीत खन्ना यांनी गुरुवारी हायकोर्टाच्या निर्दशनास आणून दिलं. हाय



कोर्टात शासकीय रुग्णालयांमधील दुरावस्थेबाबत दाखल सुमोटो याचिकेवर न्यायमूर्ती गौरी गोडसे आणि न्यायमूर्ती सोमशेखर सुंदरसेन यांच्या सुट्टीकालीन खंडपीठापुढे तातडीची सुनावणी झाली. यावेळी पालिका प्रशानाशी बोलून तातडीनं काय उपाय करता येतील? याची माहिती सादर करण्याचे निर्देश हाय कोर्टाकडून सरकारी वकिलांना देण्यात आले होते. त्यानुसार सहाय्यक डीन हे आज सायंकाळी उशिरा हाय कोर्टात हजर झाले. हायकोर्टानं पालिकेला याबाबत तातडीनं उपाययोजना करत अशी घटना पुन्हा होऊ नये याची काळजी घेण्याचे निर्देश जारी केले आहेत. तसेच मुंबई महपालिकेलाही यात प्रतिवादी करण्याचे निर्देश जारी करत, केलेल्या उपाययोजना प्रतिज्ञापत्रावर सादर करण्याचे निर्देश दिले आहेत.




दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर
आंतरराष्ट्रीय



# अफगाणिस्तानचं सैन्य पाकिस्तानमध्ये घुसलं, क्वेटा- पेशावरवर दावा, सीमेवर तुफान गोळीबार

पाकिस्तानातून मोठी बातमी समोर येत आहे, पाकिस्तान आणि अफगाणिस्तानमध्ये गेल्या अनेक दिवसांपासून सुरू असलेला तणाव आता उघड संघर्षात बदलला आहे. अफगाण सैन्यानं पाकिस्तानच्या सीमेत प्रवेश केल्याचं वृत्त आहे, समोर आलेल्या माहितीनुसार दोन्ही बाजुंनी जोरदार गोळीबार सुरू आहे, सीमेवर युद्धासारखी परिस्थिती निर्माण झाली आहे. अफगाण सैन्यानं चाघी जिल्ह्याच्या सीमावर्ती भागातून पाकिस्तानमध्ये प्रवेश केला आहे. चांघी हा भाग बलुचिस्तानमध्ये असलेल्या डुरंड रेषेजवळ आहे. डुरंड रेषा अफगाणमधील तालिबानने बेकायदेशीर घोषित केलेली आहे. समोर आलेल्या माहितीनुसार याच भागातून अफगाण सैनिकांनी पाकिस्तानमध्ये घुसखोरी केली आहे. स्थानिक सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार सीमेवर जोरदार गोळीबार सुरू असून, या घटनेत अनेक पाकिस्तानी सैनिक मारले गेले आहेत, मात्र या घटनेला अद्याप पाकिस्तानकडून कुठलाही अधिकृत दुजोरा देण्यात आलेला नाहीये. क्वेटा- पेशावरवर दावा अफगाणिस्तानने डुरंड रेषा बेकायदेशीर ठरवली आहे. त्यांनी केवळ सीमाच बेकायदेशीर घोषित केली नाही तर



पाकिस्तानच्या क्वेटा आणि पेशावरसारख्या दोन महत्त्वाच्या शहरांवरही दावा केला

आहे. पाकिस्तानी सैन्य आमच्या हद्दीत वारंवार घुसखोरी करत असल्याचा आरोपही अफगाणिस्तानकडून करण्यात आला आहे. या आरोपांना उत्तर देताना पाकिस्तानने म्हटलं आहे की, तालिबान आणि तहरीक-ए-तालिबान पाकिस्तान (टीटीपी) या दोन संघटना मिळून सातत्यानं आमच्या सैन्यांच्या चौक्यांवर हल्ला करत आहेत. यामुळे दोन्ही देशांमध्ये फार मोठी दरी निर्माण होत आहे. एकीकडे स्वतंत्र्य बलुचिस्तानसाठी बलुच आर्मीचं आंदोलन सुरू आहे, त्यांनी पाकिस्तान सरकारविरोधात बंड केलं आहे, तर दुसरीकडे आता अफगाणी सैन्यानं देखील पाकिस्तानमध्ये घुसखोरी केली आहे. अफगानिस्तानकडून पाकिस्तानच्या क्वेटा आणि पेशावर सारख्या शहरांवर दावा करण्यात आला आहे. एकीकडे बलुचिस्तानमध्ये निर्माण झालेल्या बंडामुळे पाकिस्तान संकटात सापडला आहे, हे बंड पाकिस्तानसाठी डोकेदुखी ठरलं आहे, तर दुसरीकडे आता अफगाणिस्तानने पाकिस्तानची डोकेदुखी आणखी वाढवली आहे. अफगाणिस्तानचं सैन्य पाकिस्तानमध्ये घुसलं आहे. त्यामुळे पाकिस्तान दुहेरी संकटात सापडलं आहे.

## संपूर्ण जग:पहलगामचा मास्टरमाईंड सैफुल्लाह कसूरीने भारताविरोधात ओकली गरळ

लष्कर ए तैयब्बाचा कमांडर सैफुल्लाह कसुरी याने पुन्हा एकदा भारताविरोधात गरळ ओकली. त्याने पाकिस्तानात नुकतीच भारताविरोधात रॅलीचे आयोजन केले होते. त्याने पाकिस्तानातील प्रमुख नेत्याना एकाच मंचावर आणले आणि भारताविरोधातील सूर आळवला. कसूरी हाच पहलगाम दहशतवादी हल्ल्याचा सूत्रधार असल्याचे मानण्यात येते. त्याने हल्ल्यानंतर एक व्हिडिओ प्रसारित केला होता. त्याने आपण या हल्ल्यामागे नसल्याचा दावा केला होता. पण आता कसूरीने त्याचा खरा रंग दाखवला. हाफिज सईदाचा मुलगा पण हजर पाकिस्तान मकरजी मुस्लिम लिगने ही रॅली आयोजित केली होती. यामध्ये दहशतवादी हाफिज सईद याचा मुलगा तह्ला सईद हा पण सहभागी झाला होता. यावेळी कसूरीने भारताविरोधात गरळ ओकली. "मला पहलगाम हल्ल्यासाठी जबाबदार धरण्यात आले. आता माझे नाव जगभर झाले आहे. आता मी जगात प्रसिद्ध झालो आहे." असे कसूरी म्हणाला. तर दहशतवादी मुदासिर अहमद हा ऑपरेशन सिंदूरमध्ये मारल्या गेला होता. त्याच्या नावाने रुग्णालय सुरू करणार असल्याचे कसूरी म्हणाला. तह्लाने दिल्या भारतविरोधी घोषणा भारताच्या मोस्ट वॉन्टेड यादीत 32 व्या क्रमांकावरील दहशतवादी तह्ला सईद हा पण या रॅलीत सहभागी झाला होता. त्याने भाषणाची सुरुवात नारा-ए-तकबीर याने केली. तह्ला



याने भारतविरोधी घोषणा दिल्या. या रॅलीत पाकिस्तानातील मोठे नेते सहभागी झाले होते. अनेक दहशतवादी हे पाकिस्तानच्या निवडणुकीत उमेदवार होते. पण ते या निवडणुकीत विजयी झाले नाहीत. पाकिस्तान हा दहशतवादाचा गड पाकिस्तान हा दहशतवाद्यांना अनेक वर्षांपासून पैसा पुरवत आहे. त्यात त्याचे पण नुकसान झाले आहे. पाकिस्तानचे परराष्ट्रमंत्र्यांनी सुद्धा त्याची कुबली दिली आहे. पाक कित्येक वर्षांपासून दहशतवाद्यांना पोसत आहे. आता पहलगाम हल्ल्यानंतर ऑपरेशन सिंदूरच्या माध्यमातून भारताने पाकला योग्य संदेश दिला. या मोहिमेत पाकव्याप्त काश्मीरसह पाकिस्तानमधील 100 हून अधिक दहशतवादी मारल्या गेले होते. भारतीय लष्कराने पाकिस्तान आणि पीओकेमधील 9 ठिकाणी हल्ला केला. त्यात हे दहशतवादी ठार झाले होते.

## लष्कर प्रमुख ती दक्षिणा देतील का? जगद्गुरु रामभद्राचार्य यांनी मागितले तरी काय की पाकिस्तानपर्यंत पोहचली चर्चा

पहलगाम हल्ल्यानंतर भारताने ऑपरेशन सिंदूर राबवत न्याय केला.




पाकड्यांचे कंबरडे मोडले. पण 10 मे रोजी दोन्ही देशांनी युद्धविरामाची घोषणा केल्याने भारतातील अनेक लोक नाराज झाले. पाकव्याप्त काश्मीर भारतात विलीन करण्याची ही मोठी संधी असल्याचे अनेकांना वाटत होते. आता देशाचे लष्कर प्रमुख उपेंद्र द्विवेदी बुधवारी मध्य प्रदेशातील चित्रकूट आश्रमात पोहचले. त्यांनी जगद्गुरू रामभद्राचार्य यांचे दर्शन घेतले. त्यांनी त्यांच्याकडून दीक्षा घेतली. त्यानंतर आपण लष्करप्रमुखांकडे पाकव्याप्त काश्मीर दक्षिणेत मागितल्याचे जगद्गुरूंनी सांगितले. आता त्यांची ही इच्छा पूर्ण होते का? हा चर्चेचा विषय ठरला आहे. जगद्गुरूंचे घेतले आशीर्वाद भारतीय सैन्य दलाचे प्रमुख जनरल उपेंद्र द्विवेदी हे बुधवारी चित्रकूट येथे पोहचले. त्यांच्या पत्नीने तुलसीपीठ येथील कांच मंदिरात पूजाविधी केले. तर लष्कर प्रमुखांनी सपत्नी तुलसी पीठाधीश्वर जगद्गुरू स्वामी रामभद्राचार्य महाराज यांचे दर्शन घेतले. त्यांचा आशीर्वाद घेतला. लष्कर प्रमुखांनी त्यांच्याकडून गुरू दीक्षा घेतली. लष्कर प्रमुख येणार असल्याने या भागात कडक बंदोबस्त होता. अनेक ठिकाणी बॅरिकेट्स लावण्यात आले होते.

## खराब हवामानाचा फटका, पंतप्रधानांचा सिक्कीम दौरा रद्द, पण तीन राज्यात जाणार

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आजचा सिक्कीम दौरा रद्द केला आहे. खराब हवामानामुळे मोदींना सिक्कीमला जाता आलं नाही. सिस्कीम राज्याचा आजचा आज 50 वा वर्धापन दिन होता. त्यानिमित्ताने गंगटोकमध्ये एका कार्यक्रमाचं आयोजन करण्यात आलं होतं. पण त्यांना आता बागडोगराहूनच व्हीडिओ कॉन्फरन्सद्वारे सिक्कीमच्या लोकांशी संवाद साधावा लागणार आहे. सिक्कीमचा दौरा रद्द झाला असला तरी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा तीन राज्यांचा दौरा मात्र होणार आहे.ठरलेल्या कार्यक्रमानुसार, पंतप्रधान नरेंद्र मोदी आज गुरुवारपासून चार राज्यांच्या दौऱ्यावर होते. पीएम मोदी आज आणि उद्या (29 आणि 30 मे) सिक्कीम, पश्चिम बंगाल, बिहार आणि उत्तर प्रदेशच्या दौऱ्यावर जाणार होते. त्यांच्या दौऱ्याची सुरुवात सिक्कीमपासून होणार होती. पण खराब हवामानामुळे ते सिक्कीमला जाऊ शकले नाही. पीएम मोदी राजधानी गंगटोकमधील पलजोर स्टेडियममध्ये सिक्कीमच्या स्थापनेची 50 वर्ष पूर्ण झाल्याच्या निमित्ताने कार्यक्रमाचं आयोजन करण्यात आलं होतं. त्यानंतर ते पश्चिम बंगालला रवाना होणार होते

## पाकिस्तानचा पराभव केवळ पाक सैन्याचा पराभव नाही: प्रसिद्ध अमेरिकन तज्ज्ञाने सांगितली विजयाची इन्साईड स्टोरी

ऑपरेशन सिंदूरनंतर सामान्य लोकांमध्ये भारतीय शस्त्रांची जोरदार चर्चा सुरू आहे. भारताने आतापर्यंत लढाऊ विमानांचे इंजिन का तयार केले नाही? असं अनेक लोक विचारत आहेत. या प्रश्नाच्या मागे अनेक फॅक्टर्स आहेत. पण यामागचा सर्वात मोठा फॅक्टर राजकीय इच्छाशक्तीचा आहे. 2014नंतर भारतीय डिफेन्स इंडस्ट्रीमध्ये खऱ्या अर्थाने परिवर्तनाचं काम सुरू झालं. मोदी सरकारने मेक इन इंडियाचा नारा दिला आणि स्वदेशी शस्त्रे तयार करण्याचं टार्गेट ठेवलं. परदेशातील



शस्त्रांवरील अवलंबित्व कमी करणं हा त्यामागचा उद्देश होताच. शिवाय भारतीय डिफेन्स इंडस्ट्रीलाही ग्लोबल करायचं होतं. पहलगाममधील दहशतवादी हल्ल्यानंतर भारताने ऑपरेशन सिंदूर हाती घेतलं. पण जेव्हा पाकिस्तानने दहशतवाद्यांची साथ देऊन भारतावर हल्ला केला तेव्हा मेक इन इंडिया आणि आत्मनिर्भर भारताची खरी परीक्षा सुरू झाली. प्रसिद्ध अमेरिकन संरक्षण तज्ज्ञ जॉन स्पेन्सर यांनी भारत-पाकिस्तान तणाव आणि भारताचा झालेला विजय यावर अचूक विश्लेषण केलं आहे.

अमेरिकन डिफेन्स एक्सपर्ट जॉन स्पेन्सर यांनी भारत-पाकिस्तान संघर्षावर एक समीक्षात्मक अहवाल तयार केला आहे. त्यात त्यांनी भारताच्या आत्मनिर्भरतेचं कौतुक केलं आहे. स्पेन्सर हे अमेरिकेतील वॉर इन्स्टिट्यूटमध्ये शहरी युद्धावर लेक्चर घेत असतात. जॉन स्पेन्सर यांनी या रिपोर्टमध्ये महत्त्वाचे उल्लेख केले आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची मेक इन इंडिया आणि आत्मनिर्भर भारत मोहीम पाकिस्तानच्या विरोधातील खरी विजेती ठरली आहे. भारताने केवळ परीक्षाच पास केली नाही तर, भारत स्वत:च्या शस्त्राने, स्वत:च्या आकाशात आणि स्वत:च्या अटीवर लढाई लढू शकतो हे भारताने जगाला दाखवून दिलं आहे. मोदी सरकारने

# एलन मस्क होणार अमेरिकेचा राष्ट्रपती; टाइम ट्रॅव्हलरची सर्वात मोठी भविष्यवाणी; आजवर एकही भाकीत खोटं ठरलं नाही

व्हाईट हाऊसमधून राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प आणि अब्जाधीश एलॉन मस्क यांच्या मैत्रीची छायाचित्रं आता कदाचित पुढे येणार नाहीत. कारण त्यांच्यातील मैत्री तुटल्याचे बोलले जात आहे. राष्ट्रपती निवडणुकीत दोघे हातात हात घालून अनेक ठिकाणी दिसले. मस्क याने ट्रम्प यांच्यासाठी जोरदार, तुफान प्रचार केला. 2024 मध्ये दोघांनी एकमेकांवर स्तुति सुमने वाहिली. त्याचवेळी एका टाईम ट्रॅव्हलरने या दोघांची मैत्री सहा महिन्यांच्या आत तुटेल आणि दोघे वेगळे होतील अशी भविष्यवाणी केली होती. त्यावर




कोणी विश्वास ठेवला नव्हता. पण आता हे भाकीत खरं ठरत असल्याचे समोर येत आहे.भविष्यवाणी म्हटलं की जगभरातील लोकांना बल्गेरियाची भविष्यवक्ती बाबा वेंगा आणि द ग्रेट नास्त्रेदमस तर आता जपानची रिओ तात्सुकी हिची आठवण येते. पण या टाईम ट्रॅव्हलरने सध्या जगभरात खळबळ उडवून दिली आहे. त्याने ट्रम्प आणि मस्क यांच्या मैत्रीविषयी केलेले भाकीत अगदी खरं ठरलं आहे. इतकेच काय तर त्याने यापूर्वी कोविड 19 विषयी केलेले भाकीत सुद्धा खरं ठरलं आहे.

डू कार्टिसचे भाकीत काय?

डू कार्टिस हा एक टाईम ट्रॅव्हलर आहे. त्याचे सोशल मीडिया प्लॅटफॉर्म एक्सवर एक पेज सुद्धा आहे. त्यावर तो असे खळबळजनक दावे करत असतो. अर्थात यापूर्वी त्याच्याकडे जगाने फारसे लक्ष दिले नाही. टाईम ट्रॅव्हलर डू कार्टिस याने 2025 मध्ये ट्रम्प हे मस्क याला दुर्लक्षित करतील असा दावा केला होता. द सन या दैनिकाच्या दाव्यानुसार, ट्रम्प यांनी एलॉन मस्क याला प्रशासकीय कारभारातून पूर्णपणे बाजूला केले आहे. आतापर्यंत बाबा वेंगा आणि नास्त्रेदमस यांच्या भाकिताचा पडताळा झाला आहे. त्यातील अनेक भाकीतं खरी ठरल्याचे सांगण्यात येत आहे. कार्टिस यांनी वर्ष 2015 मध्ये 2020 मध्ये महामारी म्हणजे कोविड -19 विषयी भविष्यवाणी केली होती. अर्थात कर्टिसच्या भविष्यवाणीविषयी लोकांना साशंकता आहे. 2025 मध्ये तिसरे जागतिक युद्ध होणार नाही, मात्र या वर्षात नैसर्गिक आपत्ती कोसळतील असा दावा त्याने केला आहे. आता मस्क याचे भाकीत खरं ठरतं की चूक हे लवकरच समोर येईल.

एलॉन मस्क होतील अमेरिकेचे राष्ट्राध्यक्षइतकेच नाही तर कार्टिस यांनी वर्ष 2028 साठीची एक मोठी भविष्यवाणी केली आहे. जर मूळ निवासी नसलेल्या नागरिकांना अमेरिकन निवडणूक लढवण्याचा कायदा मंजूर झाला तर एलॉन मस्क हे पुढील राष्ट्राध्यक्षाची निवडणूक लढवतील. एलॉन मस्क आणि अर्नाल्ड श्वार्झेनेगर यांच्यात हा सामना होईल. त्यात एलॉन मस्क बाजी मारेल असा दावा त्याने केला

This Newspaper Printed, Publisher, Editor and Owned by RAHUL MARUTIRAO WAIKAR and Printed at RAJVEER PRINTERS, Rajmata Jijau Colony, Navgan Collage, Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra) and Published At Dainik LOK AARAMBH OFFICE- House No. 01/03/862, Rajmata Jijau Colony, Navgan College Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra). Editor- RAHUL MARUTIRAO WAIKAR Mobile: 9272132450 Email : dainiklokaarambh@gmail.com

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक राहुल मारुतीराव वाईकर यांनी राजवीर प्रिंटर्स, राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि.बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक लोक आरंभ कार्यालय, हाऊस नं.०१/०३/८६२० राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि. बीड- ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. मो. ९२७२१३२४५०, संपादक: राहुल मारोतीराव वाईकर Email : dainiklokaarambh@gmail.com